**MHNG100024432019**

नि.दि.दा . १२५/२०१९
अन्ना – विरुध्द – रामदास

## निशाणी क्र. ३४ एकत्रित आदेश
## (पारित दिनांक २८ एप्रिल, २०२५)

अर्ज व त्यावरील खुलाशाचे अवलोकन केले. उभय पक्षांचा युक्तीवाद ऐकला.

२. प्रस्तुतचा अर्ज हा प्रतिवादी क्र. १ चे वारस अभिलेखावर दाखल करण्यासाठी, करण्यात आला आहे. प्र. वादी क्र. १ हे दि. ०२.११.२०२४ रोजी मयत झाले. त्यांच्या वारसांना अभिलेखावर दाखल करणे आवश्यक आहे. सबब, अर्ज मंजुर करावा, अशी विनंती केली.

३. प्रकरण प्रलंबीत असतांना, मार्च,२०२० पासून कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव टाळण्यासाठी टाळेबंदी लागू केली होती. त्याचा परिणाम जन–जीवनासोबतच न्यायालयीन कामकाजावर देखील झाला. मा. उच्च न्यायालयाने न्यायालयीन कामकाजासाठी वेळोवेळी परिपत्रक निर्गमित केले. मा. उच्च न्यायालयाच्या परिपत्रकान्वये दिनांक ०२.०८.२०२१ पासूनन्यायालयीन कामकाज हे पूर्ववत सुरू झाले.

४. दाव्याचे अवलोकन केले असता, दावा हा जाहीर घोषीत होऊन मिळण्याकरीता दाखल केला आहे. दाव्यामध्ये माझे पुर्व अधिकारी यांनी नि.क.१२ अन्वये दि. ०४.०६.२०२० रोजी वादमुद्दे निश्चीत केले आहे. अभिलेखावर दिवाणी प्रक्रिया संहीतेचे आदेश ७ नियम ११ चा अर्ज दिसून येतो. सदरचा अर्ज न्यायालयाने दि. १०.०२.२०२१

रोजी निकाली काढला. त्यांनतर प्रतिवादी यांनी नि.क्र. २६ अन्वये अर्ज दाखल केला आहे. सदरचा अर्ज दि. १५.०६.२०२२ रोजी निकाली काढल्याचा दिसून येतो. त्यानंतर वादी यांनी नि.क्र. २८ अन्वये तुर्तातुर्त मनाई हुकुमाचा अर्ज दाखल केला आहे. त्यास प्रतिवादी यांनी नि.क्र. ३० अन्वये उत्तर दाखल केले आहे. त्यानंतर प्रस्तुतचा अर्ज दाखल करण्यात आला. त्याच दिवशी प्रतिवादी यांनी नि.क्र. २३ अन्वये पुरसीस दाखल केली.

**५.** प्रतिवादी क्र. १ हे दि. ०२.११.२०२४ रोजी मयत झाले. अर्ज हा दि. १७.१२.२०२४ रोजी दाखल करण्यात आला. अर्ज मुदतीत आहे. अशा एकंदरीत परिस्थितीवरुन उत्तरीजिवितांना अधिकार आहे, असे दिसून येते. त्यामुळे अर्ज हा तुर्त तरी मंजुर करण्यास पात्र आहे, असे मी माझे मत नोंदवितो. एकंदरीत विवेचनावरुन मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**: आदेश :**

**१.** अर्ज हे नि.क्र. ३४ हा मंजुर करण्यात येतो.

**२.** मयत प्र.वादी क्र. १ रामदास पिट्टु मांडवकर यांचे अर्जात नमुद वारस हे अभिलेखावर घेण्यात येतात.

**३.** वादी यांनी पुढील तारखेच्या आत , त्या अनुषंगाने योग्य ती दुरूस्ती करावी आणि दुरुस्ती प्रत ही अभिलेखावर दाखल करावी.

उमरेड **(रा.भा. डोळे)**

दिनांक : २८.०४.२०२५ सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, उमरेड